Impact Factor – 6.625 | Special Issue - 303 | Sept. 2022 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED AND INDEXED JOURNAL

# DIGITAL MARKETING AND ECONOMY



- GUEST EDITOR -

Dr. R. A. Pawar

- CHIEF EDITOR -

Dr. Dhanraj T. Dhangar

- EXECUTIVE EDITORS -

Dr. Sushma Unde

Dr. Sarika Rohamare

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : Prime Publishing House, Jalgaon

**RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal** ISSN : 2348-7143
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 303 : Digital Marketing and Economy* September 2022

# : CONTENTS :

## English

1. **Growth of Digital Marketing in Indian Scenario** ........ 1
Prof. Dr. Rajaram Nathaji Wakchaure

2. **Digital Marketing Trends For 2022** ........ 7
Dr. B. D. Ranpise, Ashwini Khanderao Pawar

3. **Effects of Demonetization on E- Commerce** ........ 10
Dr. Sau.Gursal Vijaya Nitin

4. **Impact of Digital marketing and current scenario in India** ........ 13
Mr. Ganesh R. Shelke, Prof. Dr. R. G. Rasal

5. **Status of Cashless Economy in India** ........ 15
Dr. Sunil Dadaram Pawar

6. **Digital Marketing In India** ........ 18
Dr. B.D. Ranpise, Naim Husen Khatik

7. **E-Banking in India : Challenges and Opportunities** ........ 21
Dr. P. V. Kadam, Mr. Ganesh R. Shelke

8. **Digital Marketing: A new stream of marketing** ........ 24
Dr. Adinath R. Gholap, Dr. Mangal A. Gholap

9. **A Study of Digital Marketing and Its Impacts on Marketers and Consumers** ........ 26
Dr. Kanawade Pratibha Vijay, Dr. Shelke Digambar Sakharam

10. **New Trends in E-Banking in India** ........ 28
Dr Archana Anil Vikhe and Mr.Sagar Balasaheb Gholap

11. **A Study of Human Resource Management In Charitable Hospitals in Ahmednagar District** ........ 30
Dr. Borde G.D., Mr.Dighe Anil R.

12. **Cloud Computing in E-Marketing: Challenges and related solutions in 2023** ........ 34
Chhaya S. Galande, Dr. Sushma A. Unde

13. **Post Covid Opportunities and Challenges in Banking Sector in India** ........ 37
Dr. Nirmal Vijay D.

14. **A Study of Digital Marketing in Agricultural Sector** ........ 45
Dr. Suresh Sukdeo Shinde

15. **Digital Marketing Trends in India** ........ 48
Dr. Ganesh R. Deshmukh

16. **E-Banking in India** ........ 52
Dr. Jayshree R. Dighe

17. **E-banking Services in India** ........ 55
Dr. Sunil Sakhahari Mohate

18. **Recent Trends in Digital Marketing** ........ 59
Dr. Unde S. A., Dr. Rohamare S. S.

19. **Cashless Economy** ........ 64
Dr. Jayshree Dighe, Miss Harshada Naikwade

20. **E-Banking System: Advantages and Challenges** ........ 65
Dr. Pravin Babanrao Aher

21. **Digital Marketing and Social Media** ........ 67
Dr. Satish Ashinath Gonde

22. **A study on Consumers' Perception towards Digital Marketing** ........ 72
*Dr. Pooja R. Thorat

23. **Digital Marketing in India** ........ 75
Dr. Laxmi Rambhau Kangune

24. **A Study of Social Media Marketing** ........ 78
Dr. Rupali Prakash Kotwal

25. **Digital and E-Business Marketing : A Pressing Need Before Society** ........ 82
Dr. S. S. Thorat

26. **Social Media Marketing: A New Era in Globalization** ........ 86
Mr. L. M. Shaikh

27. **Marketing of Jewellery Sector** ........ 90
Prof. Dr. Argade Sanjay Laxman, Sapna Balkrushna Shahane

28. **Digital Economy: Challenges and Opportunity** ........ 92
Dr. Mangal A. Gholap, Dr. Adinath R. Gholap

29. **Relationship Between Digital Marketing and Economy Stability** ........ 94
Dr. Rohamare S.S., Dr. Unde S. A.

30. **The Impact of Digital Media on The Print Media** ........ 96
Prof. Dr. Ramesh D Darekar, CMA Sandip G. Wadghule

31. **A Study of Impact of E-Commerce on Indian Economy** ........ 98
Prof. Giri Manisha Subhash

32. **Hidden Financial Crisis -Problems and Recommendations-** ........ 101
Lt. S. A. Palande,

33. **E- Banking: Challenges and Opportunities in India** ........ 108
Dr. Parag P. Saraf, Ms. Ranita Baban Valave

34. **Social Media Marketing** ........ 115
Prof. Kulkarni Ganesh Chandrakant, Prof. Giri Ranjit Rangnath

35. **A Study of Electronic Agriculture Marketing Scheme Implemented By Central Government** ........ 117
Mrs. Manisha R. Nikam, Ranpise B.D. (Dr.)

36. **Social Media Marketing** ........ 120
Mrs.Arati Ramesh Shinde

37. **Effective Digital marketing Strategies for Non Profit organizations** ........ 121
CA Yashodhara Barhate, Dr. Kharde V. A.

38. **Challenges Before Human Resource Management In India** ........ 124
Shri. Mohan Narayan Mane

39. **Impact of Covid-19 on Social Media Marketing** ........ 128
Mr. Gaikwad V.S and Mrs. Mandhare N.S

40. **Digital Marketing in India** ........ 132
Rekha Vaman Kadale

41. **Role of ICT in Transforming Education System** ........ 134
Mrs. Snehal Dattatraya Bankar, Prof. Murtadak B. N.

42. **Current Scenario and Future Prospects pf Urban Co-Operative Banks in India** ........ 137
Mr. Rishikesh Jagdish Malani, Prof. Dr. Rajaram Wakchaure

43. **Effect of Advertising on Buying Behavior of Youth in Loni Village** ........ 142
Mrs. Rupali M. Navale

44. **Digital Trends in Banking System** ........ 145
Miss. Vidya Bhika Thorat

45. **Digital Marketing in India** ........ 149
Mrs Charusheela R Gayake, Dr.Atul N Barekar

46. **Cashless economy** ........ 152
Pansare Shivnath Bhausaheb

47. **Cashless Economy: India** ........ 156
Dr. Jayshree Singar

48. **Effects of 'FinTech' Company on Digital Marketing** ........ 159
Dr. Jagtap Balasaheb Sheshrao

49. **An Overview of Digital Marketing in India** ........ 161
Dr. Shinde Vijaykumar Gulabrao

50. **Comparison Between Amazon and Flipkart** ........ 164
Dr. G.D. Borde, Mr. H.L. Divekar

**मराठी**

51. **डिजिटल भारत – एक सशक्त अभियान** ........ 165
डॉ. विजय आबासाहेब खर्डे, प्रा. अभय कोंडीराम सिनारे

52. **डिजिटल अर्थव्यवस्थेचे परिणाम** ........ 168
डॉ. नितीन अशोक मुटकुळे

53. **रोखविरहीत अर्थव्यवस्थेच्या फायद्यातोट्यांचा अभ्यास** ........ 171
डॉ. संगीता रामेश्वरलाल जांगीड

54. **डिजिटल मार्केटिंग** ........ 174
डॉ. संगीता भालचंद्र काटकर

55. **कॅशलेस अर्थव्यवस्था समस्या, आव्हाने आणि फायदे** ........ 178
प्रा. डॉ. जे. आर. दिघे, महेश तुकाराम शेटे

56. **डिजिटल मार्केटिंग** ........ 181
प्रा. डॉ. विश्वनाथ गजाजन कोटकर

57. **ई बँकिंग** ........ 183
प्रा. डॉ. प्रविण बबनराव आहेर, आदेश बाळासाहेब ढोले

58. **ई–बँकिंग** ........ 185
प्रा. श्रीमती प्रियंका साहेबराव दिवटे

59. **डिजिटल मार्केटिंगचा इतिहास आणि उत्क्रांती** ........ 188
प्रा. एस. ए. अनाप

60. **डिजिटल अर्थव्यवस्था** ........ 191
वैशाली दिनकर कानवडे

61. **आधुनिक बँक व्यवसायाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परीणाम** ........ 194
प्रा. सिलदार तुडका पावरा, प्रा.महेश दामू रानवडे

62. **डिजिटल मार्केटींगएक फायदेशीर मार्केटींग पद्धत** ........ 196
कोमल संजय बोर्डे, प्रतिक्षा जालिदंर बोर्डे, डॉ. अर्चना गोधाजी अंत्रे

63. **डिजिटल विपणन आणि अर्थव्यवस्था : खेड तालुक्यातील मानव विकास निर्देशांक वाढीसाठी डिजिटलायझेशनचे योगदान** ........ 198
कानवडे अर्चना रामनाथ

64. **डिजिटल मार्केटिंग : फायदे आणि तोटे** ........ 201
एन. एस. मांढरे, व्ही. एस. गायकवाड

65. **शेतमालाचे विपणन** ........ 204
डॉ.उमेश अण्णासाहेब ताजणे, डॉ.रंजना अनिल दिघे, योगिता सुभाष मोरे

66. **भारतातील अर्थव्यवस्थेवरील रोखविरहीतचा परिणाम** ........ 209
देवयानी आण्णासाहेब काळे, डॉ. सौ. सुषमा उंडे

67. **ई–पेमंटच्या वापरासंबंधी समस्या आणि संधी** ........ 213
मनिषा त्रिंबक खेमनर

68. **महिलांचा आर्थिक व सामाजिक विकासासाठी सरकारच्या विविध योजना** ........ 215
श्रीमती. मनिषा निवृत्ती अंत्रे, प्रा. डॉ. राजेंद्र यशवंत शिंदे

69. **भारतातील ई–बँकिंग सुविधा** ........ 217
प्रा. डॉ. प्रमोदीनी बी. नवले

70. **प्रसारमाध्यमे आणि डिजिटल मार्केटिंग** ........ 219
प्रा. एन. एस. पर्वत

71. **आधुनिक अर्थव्यवहार साधनांच्या उपयोगिता मुल्याचे विश्लेषण** ........ 224
डॉ. विजय अपपासाहेब खर्डे, सुमित रमेश पुलाटे

72. **डिजिटल मार्केटींगचा भारतीय अर्थशास्त्रावर होणारा परिणाम** ........ 226
प्रविण कैलास वर्पे, गणेश संपत गिते, प्रा. एल. एम. शेख

73. **धर्मदाय रूग्णालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध योजनेचे आर्थिक व सामाजिक अध्ययन विशेष संदर्भ साईबाबा रुग्णालय शिर्डी** ........ 230
कु. जाधव चेतना बबनराव, प्रो. डॉ. आर. जी. रसाळ

74. **भारतातील ई–बँकिंग क्षेत्राची आधुनिक काळातील गरज व महत्त्व** ........ 233
प्रा. आर. बी. लव्हाटे, प्रा. आर. बी. कडू

75. **ई–बँकिंग आणि इंटरनेट बँकिंगच्या अर्थव्यवस्थेतील सुविधा** ........ 235
प्रा. आर. बी. लव्हाटे, डॉ. डी. एस. रांधवणे

ISSN : 2348-7143
September 2022
RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 303 : Digital Marketing and Economy*

# आधुनिक अर्थव्यवहार साधनांच्या उपयोगिता मुल्याचे विश्लेषण

**डॉ. विजय अपपासाहेब खर्डे**
सहाय्यक प्राध्यपक (मार्गदर्शक)
वाणिज्य विभाग,पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर
**सुमित रमेश पुलाटे**
संशोधक विद्यार्थी
वाणिज्य विभाग,पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर

**प्रस्तावना :**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. या माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करून मानवी आर्थिक व्यवहार प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आज बँकिंग क्षेत्राने ई–बँकिंग प्रक्रिया राबविण्यास प्रारंभ केला आहे. या प्रक्रियेमुळे वित्तीय व्यवहारात गतिमानता व विश्वसनीयता तसेच पारदर्शीपणा आला आहे. या नवनवीन प्रक्रियांचे व्यवहारातील उपयोगिता मूल्य समजावून घेण्याचा प्रयत्न या संशोधनामध्ये करण्यात आला आहे.

**अर्थ व संकल्पना :**

**उपयोगिता व उपयोगिता मुल्य :** ''वस्तूच्या अंगी असणारी मानवी गरज भागविण्याची क्षमता म्हणजे उपयोगिता होय. तर त्यांची उपयुक्तता म्हणजे वस्तूचे उपयोगिता मूल्य होय.

**आधुनिकीकरण :** ''आधुनिकीकरण म्हणजे विशिष्ट सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी गतिमान आणि सातत्याने चालू असलेली एक प्रक्रिया होय.''

**ई–बँकिंग :** ''ई–बँकिंग म्हणजे इलेक्ट्रॉनिक बँकिंग होय. म्हणजे बँकेमध्ये प्रत्यक्षात न जाताही इंटरनेटच्या मदतीने ज्या बँकिंग सेवांचा वापर केला जातो त्या सेवांना ई बँकिंग असे म्हणतात.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) बँकिंग क्षेत्रातील आधुनिक प्रणालीचा मागोवा घेणे.

२) बँकिंग क्षेत्रातील परिवर्तनाचे उपयोगिता मूल्य तपासणी.

**ई–बँकिंग प्रक्रिया :**

१) **स्वयंचलित चलन आदान प्रदान यांत्रिक प्रणाली (ए.टी.एम.) :** ''आर्थिक व्यवहारात चलनांच्या आदान–प्रधानात आधुनिकता येण्यासाठी ई बँकिंगच्या दिशेने बँकांनी टाकलेले महत्त्वाचे पाऊल म्हणजेच एटीएम होय.'' एटीएम मुळे ग्राहकांना बँकेत न जाता पैसे काढता व भरता येतात. एटीएम हे एक संगणकृत उपकरण आहे ज्याच्या साह्याने ग्राहकांना बँकिंगच्या आर्थिक हस्तांतरणासंबंधीत विविध सेवा पुरविल्या जातात जसे की पैसे काढणे शिल्लक रक्कम तपासणी एटीएम मशीन मधून आपण एटीएम कार्डच्या साह्याने पैसे काढू शकतो. एटीएम कार्ड ग्राहकांना आपल्या बँकेमार्फत देण्यात येते. एटीएम वापरासाठी ग्राहकाला चार अंकाचा पिन क्रमांक मिळतो हा पिन ग्राहकाला गोपनीय ठेवावा लागतो त्यामुळे. ग्राहकाच्या आर्थिक व्यवहारास सुरक्षितता प्राप्त होते.

२) **मोबाईल बँकिंग :** आपल्या मोबाईलच्या सहाय्याने आपण आपल्या बँकेच्या संबंधित आथिक व्यवहार करू शकतो त्यास मोबाईल बँकिंग असे म्हणतात. काही बँकांनी आपल्या मोबाईल हँडसेट मध्ये त्यांच्याकडील विशिष्ट सॉफ्टवेअर एप्लीकेशन तयार करून व्यक्तिगत मोबाईल बँकिंग सेवा उपलब्ध करून दिली आहे. मोबाईल बँकिंग सेवा ही जीपीआरएस प्रकारातल्या मोबाईल हँडसेट वरच चालू शकते. ही सेवा ग्राहक सहजतेने वापरू शकतो. त्यामुळे बँकिंग क्षेत्रातल्या ह्या नव्या सुविधेचा वापर करणे ग्राहकांना सहज शक्य झाले आहे. जवळपास सर्वच राष्ट्रीयकृत बँका तसेच खाजगी क्षेत्रातील काही मोठ्या बँकांचे आर्थिक व्यवहार मोबाईल बँकिंग द्वारे करू शकतात. त्यासाठी संबंधित बँकेचे सॉफ्टवेअर ग्राहकाला आपल्या मोबाईल मध्ये जतन करावे लागते. त्यानंतर त्या सॉफ्टवेअरच्या वापरासाठी ग्राहकाला सांकेतिक क्रमांक तयार करावा लागतो. ज्यामुळे ग्राहकाला आपल्या आर्थिक व्यवहारा संदर्भात गोपनीयता व सुरक्षितता ठेवणे सहज शक्य होते. मोबाईल बँकिंगच्या माध्यमातून पुरविण्यात येणाऱ्या सेवा आपल्या खात्यातील शिल्लक तपासणी प्रत्येक व्यवहाराच्या तपशील माहिती करून घेणे, इलेक्ट्रॉनिक माध्यमातून विविध बिलांचे शोधन करणे, स्वतः च्या खात्यातून रकमांचे हस्तांतरण करणे,. थोडक्यात मोबाईल बँकिंग या सेवेद्वारे बँक आपल्या ग्राहकाला प्रत्यक्षात रकमांची देवाणघेवाण ही सेवा वगळून इतर सर्व प्रकारचे सेवा उपलब्ध करून देत असते.

३) **पतपत्र (क्रेडिट कार्ड) :** बँकेच्या आधुनिक साधनांपैकी महत्त्वाचे म्हणजे क्रेडिट कार्ड हे आहे. हे क्रेडिट कार्ड ग्राहकाला त्याची पत व व्यवहारांची माहिती पाहून बँकेद्वारे देण्यात येते. या सुविधेचा वापर करत असताना ग्राहकाला विशिष्ट मर्यादेपर्यंतच खरेदी करता येते. क्रेडिट कार्ड हे एक प्रकारचे कर्जच असते. ज्यामध्ये बँकेचा ग्राहक आपल्या खात्यात रक्कम नसताना ही किंवा कमी रक्कम असतानी या कार्डच्या माध्यमातून आपले व्यवहार पूर्ण करू शकतो. क्रेडिट कार्ड ही ग्राहकांची

देयता असल्याने बँकेद्वारे ही रक्कम वसूल करण्यात येते. त्याचबरोबर बँक संबंधित ग्राहकाकडून क्रेडिट कार्डचे सेवाशुल्कही आकारत असते.

४) **रियल टाईम ग्रॉस सेटलमेंट (आर.टी.जी.एस.):** आरटीजीएस मध्ये खातेदाराने आपल्या बँक खात्यातून दुसऱ्याच्या बँक खात्यात ई हस्तांतरणाच्या सहाय्याने राशीचे स्थानांतरण केले असता स्थलांतरित केल्या जाणाऱ्या राशी दुसऱ्याच्या खात्यात त्वरित जमा करणे होय. अशाप्रकारे राशीच्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरण करण्यासाठी देशाची मध्यवर्ती बँक समायोजन ग्रहाचे कार्य करीत असते. आरटीजीएस पद्धतीचा ग्राहकाला उपभोग घेण्याकरिता व ती प्रणाली परिणामकारक ठरण्याकरिता ग्राहकाला बँकेकडे पुढील माहिती पुरवावी लागते. स्थलांतरित करावयाची रक्कम, ज्या खात्यातून रक्कम स्थलांतरित होणार आहे, व ज्या खात्यात स्थलांतरित करायची आहे, अशा दोन्ही खात्यांचा खाते नंबर, ज्या खात्यात रक्कम जात आहे त्या बँकेचे नाव व शाखा, प्राप्त करणाऱ्या बँकेचा आय एफ एस सी क्रमांक, प्राप्त खातेदाराचे संपूर्ण नाव त्याच बरोबर मोबाईल नंबर. इत्यादी सर्व प्रकारची माहिती ग्राहकाला बँकेत पुरवावी लागते.

५) **इमिजिएट पेमेंट सर्विस (आय.एम.पी.एस.) :** आय.एम.पी.एस.सी. सेवा त्वरित निधी ट्रान्सफर सेवा आहे. ज्याचा वापर करून आपण कधीही पैसे पाठवू शकतो. ही सेवा कधीही वापरली जाऊ शकते. या सेवेअंतर्गत तत्काळ पैसे पाठवणे सहज शक्य होते. फसवणुकीच्या तक्रारी टाळण्यासाठी व्यवहारांवर मर्यादा टाकण्यात येते. आय एम पी एस सेवेचा वापर करून पैसे ट्रान्सफर करण्यासाठी आपल्याला ज्या व्यक्तीला पैसे पाठवायचे आहे त्या खातेधारकाचा आय एम पी एस क्रमांक आणि त्याचा मोबाईल नंबर माहित असणे आवश्यक आहे. आपण २४ तासात कधीही पैसे ट्रान्सफर करू शकतो.

६) **युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यु.पी.आय.) :** ही रियल टाइम पेमेंट सिस्टीम आहे. जी व्ही पी ए वर्चुअल पेमेंट ऍड्रेस वापरून कोणत्याही स्मार्टफोन द्वारे व्यवहार करण्यास अनुमती देते. यूपीआय मार्फत पैसे ट्रान्सफर करण्यासाठी कोणत्याही बँक अकाउंट ची गरज लागत नाही. यामध्ये फक्त मोबाईल नंबर किंवा संबंधित व्यक्तीचे नाव पुरेसे आहे. यूपीआय मार्फत २४ तासात केव्हाही आपण एक लाखापर्यंतची रक्कम हस्तांतरित करू शकतो.

**बँकिंग आधुनिक अर्थव्यवहार साधनांच्या कार्यप्रणालीचे मुल्यमापन :**

**अ) सकारात्मक :** १) बँकांच्या आधुनिक साधनांच्या मदतीने आपण २४ तास तसेच वर्षाचे ३६५ दिवस व्यवहार करू शकतो. २) बँकेमध्ये प्रत्यक्षात न जाता आपण मोबाईल किंवा कम्प्युटरच्या साह्याने घरबसल्या व्यवहार करू शकतो. ३) बँकांच्या आधुनिक साधनांद्वारे आपण विविध बिलांची देणे देऊ शकतो उदाहरणार्थ लाईट बिल. ४) आधुनिक साधनांच्या मदतीने आपण बँकेत न जाता ऑनलाइन पद्धतीने पासबुक चेक बुक डेबिट कार्ड क्रेडिट कार्ड यांची घरबसल्या मागणी करू शकतो. तसेच आपल्या बँक खात्यातील रक्कम घरबसल्या चेक करू शकतो. ५) जर पेमेंट करताना आपल्याला काही अडचण आली तर ती आपण ऑनलाइन तक्रार करून सोडवू शकतो.

**ब) नकारात्मक :** १) बँकेचे आधुनिक अर्थव्यवहार सामान्यत: इंटरनेटच्या मदतीने होत असल्यामुळे हे सर्व मोबाईल किंवा कम्प्युटर द्वारे होत असतात. जर चुकीने ग्राहकाने दुसऱ्या कोणाच्या मोबाईल मधून किंवा कम्प्युटर मधून व्यवहार केले तर ग्राहकाची महत्त्वाची गोपनीय माहिती दुसऱ्या व्यक्तीला सहज उपलब्ध होऊ शकते. व यातून धोका संभवतो. २) काही वेळा इंटरनेट द्वारे केलेले व्यवहार फेल होऊ शकतात. त्यामुळे आपल्या कामात अडचणी निर्माण होऊ शकते. ३) मोबाईल किंवा कम्प्युटर मध्ये अँटीव्हायरस नसेल तर आपल्या खात्याची माहिती लिक होऊ शकते. ४) जर काही भागात पायाभूत साधनांचा विकास झालेला नसेल किंवा निरक्षर जनता असेल तर या आधुनिक साधनांचा वापर करणे शक्य होत नाही.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

आज बँकिंग क्षेत्रामध्ये झालेल्या आधुनिक प्रणालीच्या समावेशामुळे अर्थव्यवहारात सुसूत्रीकरण व सुलभता आली आहे. त्याचप्रमाणे या प्रणालीच्या माध्यमातून अर्थव्यवहार पारदर्शक व विश्वसनीय झालेले आहेत. हे जरी खरे असले पण उपयोगिता मूल्य शोधत असताना खरंच सामान्यांच्या जीवनमानावरती यांचा सकारात्मक परिणाम झालाय का? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो आणि आकडेवारी पाहता कुठल्याही क्षेत्रातील बँकिंग ही भांडवली क्षेत्रात गुंतवणुकीत आघाडीवर असताना आजही सामान्य माणूस जनधन बचत खाते येईपर्यंत या क्षेत्राचा भाग नव्हता हेही वास्तव आहे. आधुनिकता किंवा वैज्ञानिक प्रणाली हे आर्थिक व्यवहारांचे सुसूत्रीकरण करते परंतू कृषीप्रधान भारत देशात कृषी क्षेत्राशी संबंधित बँकिंग क्षेत्रातील भांडवली गुंतवणुकीचा दर वाढणे हेच खरे अर्थ व्यवहारांचे सुसूत्रीकरण होय. त्याचवेळी या आधुनिक अर्थ व्यवहार साधनांना उपयोगिता मुल्य व आर्थिक व सामाजिक आशय प्राप्त होईल. 'उपयोगीता म्हणजे कल्याण' ही संकल्पना अर्थपुर्ण बनेल.

**संदर्भ :**

१. बँकिंग तत्व आणि व्यवहार, एस.एम.कोलते, प्रशांत प्रकाशन,जळगाव,जानेवारी २०१५.
२. अर्थात, अच्युत गोडबोले, राजहंस प्रकाशन, पुणे, सप्टेंबर २०१४.
३. आधुनिक बँक व्यवसाय आणि वित्त पद्धती, के.बी.दिवटे, प्रशांत प्रकाशन, जळगाव, ५ सप्टेंबर २०१६.
४. भारतीय बँकिंग व्यवस्था, शंकर तळेकर, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद